महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र. रासाप्रपक/कृशिप्र-१३२६/प्रवेश परीक्षा/परिपत्रक/२१२ दिनांक : ०२/०२/२०२६

# परिपत्रक

**विषय : कृषी व कृषी संलग्न पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक ऑनलाईन सामाईक प्रवेश परीक्षेसंदर्भात.......**

संदर्भ :
१) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग आठ, असाधारण क्रमांक ९४, दिनांक ऑगस्ट १७, २०१५.
२) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक २२, दिनांक जानेवारी १५, २०१८.
३) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १५१७/प्र.क्र.२०(१)/७अे, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१८.
४) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक १९२, दिनांक जून १, २०१८.
५) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण मपवि २०१८/प्र.क्र.६७/महापसू, दिनांक १८ जून, २०१८.
६) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक ६७, दिनांक फेब्रुवारी २३, २०१८.
७) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक २३९, दिनांक जुलै २४, २०१८.
८) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक १७०, दिनांक जून १, २०१९.
९) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक २२३, दिनांक सप्टेंबर २८, २०२०.
१०) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक ७२, दिनांक मार्च १५, २०२१.
११) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक २१७, दिनांक जून ११, २०२४.
१२) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक २१७, दिनांक जुलै २३, २०२५.

सन २०१५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ अन्वये महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था प्रवेश व शुल्क विनियमन आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम करण्यात आला असून प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. त्यानुसार सन २०१८ पासून राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत कृषी आणि कृषी संलग्न व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांकरिता ऑनलाईन सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते.

संदर्भ क्र. २ ते १२ च्या शासन निर्णय आणि अधिसुचनेनुसार पुर्णवेळ कृषी व कृषी संलग्न पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेशाचे विनियमन करण्यासाठी नियम करण्यात आले.

महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषद, पुणे यांच्या अंतर्गत चार कृषी विद्यापीठ येत असून सदर विद्यापीठांतर्गत कृषी व कृषी संलग्न पदवी अभ्यासक्रमांची एकूण १९८ महाविद्यालये आहेत. त्यामध्ये शासकीय आणि शासकीय अनुदानित ४७ आणि विनाअनुदानित १५१ महाविद्यालये आहेत. सर्व महाविद्यालयांची एकूण प्रवेश क्षमता १७७९६ इतकी आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत अभियांत्रिकी, औषधवैद्यकशास्त्र तसेच कृषी शिक्षण पदवी अभ्यासक्रमांसाठी एमएचटी-सीईटी २०२६ ऑनलाईन सामाईक प्रवेश परीक्षा राबविण्यात येते. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या एमएचटी-सीईटी २०२६ या परीक्षेमध्ये पीसीएम (PCM) आणि पीसीबी (PCB) असे दोन गट आहेत. पीसीएम करिता १५० प्रश्न असतात, त्यामध्ये फिजिक्सचे ५०, केमिस्ट्रीचे ५० आणि गणिताचे ५० तर पीसीबी करिता २०० प्रश्न असतात त्यात फिजिक्सचे ५०, केमिस्ट्रीचे ५० आणि बायोलॉजीचे १०० अशी विभागणी (Paper Pattern) असते. शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करीता एमएचटी-सीईटी २०२६ ही परीक्षा दोनदा घेण्यात येणार आहे. पहिली माहे एप्रिल, २०२६ मध्ये आणि दुसरी माहे मे, २०२६ मध्ये घेण्यात येणार आहे. एमएचटी-सीईटी २०२६ (पीसीएम आणि पीसीबी) या परीक्षेचा निकाल पर्सेंटाईल पध्दतीने लावण्यात येतो व त्या गुणांद्वारे खालील नमूद नऊ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी उमेदवार पात्र ठरत असतात.

कृषी व कृषी संलग्न पदवी अभ्यासक्रमाचे खालील तक्त्यातील नऊ अभ्यासक्रम आणि त्यासाठी एमएचटी-सीईटी २०२६ ऑनलाईन सामाईक प्रवेश परीक्षेतील कोणता गट (पीसीएम आणि पीसीबी) लागू आहे याची माहिती नमूद करण्यात आली आहे. त्यानुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत ऑनलाईन सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते.

| अ. क्र. | अभ्यासक्रम | एमएचटी-सीईटी विषय ग्रुप |
|---|---|---|
| १. | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषी<br>B.Sc. (Honours) Agriculture) | पीसीबी किंवा पीसीएम |
| २. | बी. एस्सी. (ऑनर्स) उद्यानविद्या<br>(B.Sc. (Honours) Horticulture) | पीसीबी किंवा पीसीएम |
| ३. | बी. एस्सी. (ऑनर्स) वनविद्या<br>(B.Sc. (Honours) Forestry) | फक्त पीसीबी |
| ४. | बी. एफ.एस्सी. मत्स्यविज्ञान<br>(B.F.Sc. Fishery Science) | फक्त पीसीबी |
| ५. | बी. एस्सी. (ऑनर्स) सामुयिक विज्ञान<br>(B.Sc. (Honours) Community Science) | पीसीबी किंवा पीसीएम |
| ६. | बी. टेक. जैवतंत्रज्ञान<br>(B. Tech. Biotechnology) | पीसीबी किंवा पीसीएम |
| ७. | बी. टेक. कृषी अभियांत्रिकी<br>(B. Tech. Agricultural Engineering) | फक्त पीसीएम |
| ८. | बी. टेक. अन्नतंत्रज्ञान<br>(B.Tech. Food Technology) | पीसीबी किंवा पीसीएम |
| ९. | बी. एस्सी. (ऑनर्स) कृषी व्यवसाय व्यवस्थापन<br>(B.Sc. (Honours) Agriculture Buisness Management) | पीसीबी किंवा पीसीएम |

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्रवेश परीक्षा अर्ज नोंदणी प्रक्रियेस दिनांक १०/०१/२०२६ पासून सुरुवात झाली असून अंतिम दिनांक १२/०२/२०२६ असा आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षांतर्गत कृषि तसेच इतर विविध विभागांच्या अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या कार्यालयीन www.cetcell@mahacet.org संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

महाराष्ट्र राज्यातील विज्ञान शाखेच्या विविध कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये ११वी व १२वी इयत्तेमध्ये शिकणाऱ्या सर्व इच्छुक उमेदवारांना कृषी शिक्षणामधील सर्व नऊ अभ्यासक्रमांची माहिती व्हावी तसेच सदर नऊ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असणारी सामाईक प्रवेश परीक्षा एमएचटी-सीईटी २०२६ (पीसीएम आणि पीसीबी गट) याबद्दल माहिती होणे आवश्यक आहे. तेव्हा सदर परीपत्रक आपण आपल्या महाविद्यालयाच्या नोटिस बोर्डवर प्रदर्शित करावे. जेणेकरुन, सर्व इच्छुक विद्यार्थी माहितीचा लाभ घेऊ शकतील.

**सही/-**
**आयुक्त**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**